# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

**अपिल क्र.१ / २०१०**

**सुनावणी दिनांक २०/१/२०१०**

श्री किशोर टाकणे,
सहयाद्री को.ऑपरेटीव्ह हौ.सोसायटी,
प्लॉट नं.२, बि.नं.सी/२, रुम नं.२/३,
सेक्टर ८ बी, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई-४०० ६१४ ... अर्जदार/ॲपेलंट

विरुध्द

माहिती अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई आणि इतर ... उत्तरवादी/रिसपॉंडंट

## आदेश

अपिल करणार यांनी आस्थापना शाखेकडे दिनांक ७/१२/२००९ च्या अर्जाद्वारे माहिती अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई-२२ यांच्यामार्फत २००४ पासून पुढील कालावधीची माहिती मागितलेली होती. सदरहू अर्जाच्या अनुषंगाने योग्य ती माहिती न मिळाल्यामुळे दिनांक ७/१/२०१० रोजी अपिलीय अधिकारी यांच्याकडे खालील मुद्दयांवर अपिल दाखल केलेले होते. त्या अनुषंगाने आस्थापना शाखेने दिनांक १९/१/२०१० च्या पत्राद्वारे माहिती अधिकारी यांना माहिती सादर केली. त्याबाबत खालीलप्रमाणे चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला.

१. दिनांक १७/९/२००९ च्या कार्यालयीन टिप्पणीची छायांकित प्रत मिळाली असल्याबाबत अपिल करणार यांनी खात्री करुन घेऊन, सदर प्रत मिळाल्याचे मान्य केले. सदरहू प्रत कोणाकडून प्राप्त झाली असे अपिल करणार यांनी विचारले असता, ती प्रत सचिव (पर्यावरण) यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाली असल्याचे स्पष्ट केले.

२. (अ) मुददा क्र.२ मध्ये अपिल करणार यांनी मुळ माहितीच्या अर्जामध्ये मप्रनि मंडळामध्ये सन २००४ पासून पदोन्नती नियम नसताना अथवा पदोन्नती नियमांना डावलून अनियमित पदोन्नती किती झाल्या आहेत व किती पदोन्नत्यांना पर्यावरण विभागाने मान्यता दिलेली आहे, याची माहिति दयावी व संबंधित साक्षांकित दस्ताऐवजांच्या प्रती देण्यात याव्यात, ही मागणी केलेली होती.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, दिनांक ६/१/१९९७ च्या नियमाप्रमाणे जे शासनमान्य आहेत, त्याप्रमाणे मप्रनि मंडळामध्ये पदोन्नत्या दिल्या जातात. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी असेही स्पष्ट केले की, २००४ नंतर दिनांक ६/१/१९९७ च्या शासनमान्य सेवा प्रवेश नियमांना डावलून कोणतीही पदोन्नती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारे पदोन्नती नियमांना डावलून अनियमित पदोन्नत्या सन २००४ पासून झालेल्या नसल्यामुळे अशी माहिती देण्याचा प्रश्न उदभवत नाही, असे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी स्पष्ट केले. दिनांक ६/१/१९९७ च्या शासनमान्य सेवा शर्ती नियमांच्या पत्रांची प्रत अपिल करणार यांना उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

(ब) अपिल करणार यांनी दिनांक १५/४/२००८ रोजी विधान परिषदेत झालेल्या लक्षवधी सुचनेस अनुसरुन किती अनियमीत पदोन्नत्या मंडळाने रद्द केलेल्या आहेत याची माहिति व संबंधीत दस्तऐवज आणि आश्वासन पुर्तीच्या अहवालाची छायांकित प्रत अपिलकर्त्यांनी मागितलेली होती.

त्याबाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, सचिव, पर्यावरण विभाग यांना दिनांक २९/९/२००८ च्या पत्राद्वारे लक्षवेधी सुचनेवरील आश्वासन पूर्तीचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अपिल करणार यांनी मागितलेली माहिती उपलब्ध आहे. अपिल करणार यांचे म्हणणे असे आहे की, लक्षवेधी सुचनेमध्ये अनियमित नियुक्त्या/पदोन्नत्या रद्द करुन अहवाल देणे क्रमप्राप्त होते, मात्र सदरहू अहवालामध्ये किती नियुक्त्या रद्दबातल केल्या, ज्या अनियमित होत्या, याचा उल्लेख नाही.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, सदरहू दिनांक २९/९/२००८ च्या पत्रामध्ये लक्षवेधी सुचनेमध्ये जी अनियमितता दुरुस्तीबद्दल कळविण्यात आले होते, ती दुरुस्ती करुन आश्वासन पुर्तीचा अहवाल सादर केलेला आहे. याव्यतिरिक्त इतर कुठलाही अहवाल मंडळाकडे उपलब्ध नाही. अपिल करणार यांनी सदरहू अहवाल यापूर्वीच मिळाल्याचे मान्य केले.

३. अपिल करणार यांनी मूळ माहिती अर्जामध्ये मंडळामध्ये सन २००४ पासून अधिकारी आणि कर्मचारी यांची पदे, सेवा प्रवेश नियमानुसार सरळ सेवेने (जाहिरात) वगैरे न देताच अथवा पदोन्नती नियमांना डावलून, अनियमित पदोन्नती नियमांचे उल्लंघन करुन भरले आहे, असे मप्रनि मंडळ कर्मचारी संघटनेचे आक्षेप व तक्रारी आहेत, त्याच्या प्रती व त्यावर मंडळाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उपलब्ध करुन द्यावा.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक १९/१/२०१० च्या पत्राद्वारे अशी माहिती दिली की, सरळसेवा / पदोन्नतीची सर्व पदे मंडळाच्या सेवाप्रवेश नियमानुसार भरली जातात. मात्र, कर्मचारी संघटनेने कोणाच्या संदर्भात तक्रार केली आहे, याबाबतची परिपूर्ण माहिती दिल्यास, त्यानुसार माहिती देण्यात येईल. अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही.

अपिलीय प्राधिकरणाचे असे स्पष्ट मत आहे की, राज्य माहिती आयोग, मुख्य यांनी दिलेल्या सुचनेनुसार उपलब्ध असणारी माहिती उपलब्ध करुन देणे, हा माहितीचा अधिकार अधिनियमाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळें आस्थापना शाखेने याबाबत त्यांच्याकडे जी काही माहिती उपलब्ध आहे व ती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, तशी १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्यात यावी, जेणेकरुन, अपिल करणार यांची कोणतीही तक्रार राहणार नाही.

४. मुद्दा क्र.४ मध्ये अपिल करणार यांनी एकूण १४२ कंत्राटी तत्वावरील कर्मचा-यांपैकी फक्त ११० कंत्राटी कर्मचा-यांच्याच सेवा, श्री विनोदजी तावडे व इतर यांच्या लक्षवेधी सुचनेस अनुसरुन खंडीत करण्यात आलेल्या आहेत, मात्र उर्वरित ३२ कर्मचा-यांबाबत संपूर्ण तपशीलवार माहिती अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे मिळाली. त्यामध्ये कोणाची शिफारस असल्यास अथवा त्यांच्याकडून महिन्याच्या शेवटी लाच मिळत असल्यास सदरहू माहिती दस्तऐवजासह विस्तृत स्वरुपात मिळावी, असे स्पष्ट केलेले आहे.

अपिलीय अधिकारी म्हणून अर्जदार यांनी लाच मिळत असल्यास वगैरे उल्लेख करणे योग्य नसल्याचे मत आहे. कारण अशा बाबतीमध्ये लेखी पुराव्याशिवाय कोणत्याही प्रकारचे आरोप करणे इष्ट होणार नाही, असे अपिलीय प्राधिका-यांचे स्पष्ट मत आहे. अपिल करणार यांनी असे पुरावे वेळ आल्यास, उपलब्ध करुन देण्याची तयारी दाखविली परंतु अपिलाचा मूळ विषय वेगळा असल्यामुळे, अपिलीय प्राधिकरणासमोर सदरहू पुरावे दाखल करुन घेणे इष्ट होणार नाही असे अपिलीय प्राधिकरणाचे मत आहे.

अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, उपलब्ध करुन दिलेल्या माहितीत, मंडळाच्या सेवेचा कालावधी मुलाखती घेण्याचा तपशील, सेवा नियोजन कार्यालयाची शिफारस, सरळसेवेने भरती केली का? संबंधीत कार्यालयीन टिप्पणी आणि कोणाची शिफारस, त्याबाबतचा तपशील जोडलेला नाही. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिल करणार यांना दिलेली असल्याचे स्पष्ट केले. मात्र, अपिल करणार यांचे समाधान झाल्याचे दिसून आले नाही.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी असेही स्पष्ट केले की, याव्यतिरिक्त अपिल करणार यांनी सांगितल्याप्रमाणे खडके, वाहन चालक आणि शिवाजी जाधव, शिपाई यांच्या नियुक्तीची टिप्पणी तसेच चलवदे आणि डॉ हर्षवर्धन यांची माहिती अर्ज केल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. अपिल करणार यांनी शासन निर्णय दिनांक १४/१२/२००७ च्या मागासवर्गियांच्या सरळसेवा व पदोन्नतीचा अनुषेश भरुन काढण्याबाबतच्या शासन आदेशाची प्रत उपलब्ध न झाल्याबाबत स्पष्ट केले, त्याबाबत सदरहू माहिती संकेत स्थळावर असल्याचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितले असता, सदरहू निर्णय संकेतस्थळावर नसल्याचे अपिल करणार यांनी सांगितले.

अपिलीय अधिका-यांचे स्पष्ट मत आहे की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे ज्या विभागांकडे अशी माहिती उपलब्ध आहे, त्या विभागाकडे सदरहू प्रकरण वर्ग करणे किंवा तशा प्रकारे अर्जदारास सदरहू विभागाकडे जाण्यास लेखी सांगणे, हे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

६वा७. श्री अतुल पैठणे आणि कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदाची इतिवृत्ताची प्रत अपिल करणारास दिनांक १९/१/२०१० च्या पत्राद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

येणेप्रमाणे वर उल्लेख केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या अधिन राहून, अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी मुंबई येथून

(सही)
द.त्रि. देवळे )
ॲपेलेट ऑथॉरिटी
मप्रनि मंडळ

C:\Documents and Settings\Ranjana\My Documents\Marathi\Right to Information.doc